विक्रीकर निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१२

A

परीक्षा दि : 30-07-2012

CODE : **HOI**

प्रश्नपुस्तिका क्रमांक

BOOKLET NO.

प्रश्नपुस्तिका - II

**विक्रीकर विभागाद्वारे अमलबजावणी करण्यात येणारे कायदे व नियम, विक्रीकर विभागाची कार्यपद्धती व लेखाशास्त्र**

वेळ : 2 (दोन) तास

एकूण प्रश्न : 200

एकूण गुण : 200

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 200 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. महाराष्ट्र मूल्य वर्धित कर अधिनियम 2002 नुसार कलम 4 मध्ये __________ अंतर्भूत आहे.
(1) विवक्षित मालावर कर न बसवता येणे
(2) देय असलेले कर
(3) आवेष्टनासाठी वापरण्यात येणाऱ्या सामग्रीवरील कराचा दर
(4) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालावर विक्रीकर बसविणे

As per MVAT, Act 2002., Section 4 includes :
(1) Taxes not leviable on certain goods.
(2) Taxes payable.
(3) Rate of tax on packing material.
(4) Levy of sales tax on the goods specified in schedules.

---

2. दिनांक 1-4-2010 पासून कोणत्या परिशिष्टातील कराचा दर 5 टक्के आहे ?
(1) A (2) B (3) C (4) D

In which Schedule Rate of Tax is 5% with effect from 1-4-2010 ?
(1) A (2) B (3) C (4) D

---

3. कलम 2(13) नुसार, आयातदार कोणास म्हणता येणार नाही ?
(1) जो कोणताही माल राज्यात आणतो
(2) जो बाहेरील राज्यातून माल आणतो
(3) राज्यात खरेदी करणारा
(4) ज्याला कोणत्याही राज्यातून माल पाठविला जातो

As per Section 2(13) importer doesn't mean :
(1) who brings any goods in to the state.
(2) brings the goods from outside.
(3) purchases goods in the state.
(4) or to whom goods are dispatched from any place outside the state.

---

4. ऐच्छिक नोंदणी दाखला घेण्यासाठीची अनामत रक्कम रु. __________/-
(1) रु. 100 (2) रु. 5000 (3) रु. 25000 (4) रु. 50000

Amount of security deposit for Voluntary Registration is Rs. __________/-
(1) Rs. 100 (2) Rs. 5000 (3) Rs. 25000 (4) Rs. 50000

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

5. राज्य सरकार नोंदणीकृत व्यापाऱ्याने _________ यासाठी केलेल्या मालाच्या विक्री किंवा विक्रीवर्गावर येणाऱ्या करावर संपूर्ण किंवा अंशत: करमाफी देऊ शकते.

(1) वीज निर्मिती (2) वीज हस्तांतरण

(3) वीज वितरण (4) (1), (2) व (3) सर्व पर्याय

State Govt. may exempt fully or partly the payment of tax, on any sales or classes of sales of goods made by registered dealer for.

(1) use in generation of electricity (2) use in transmission of electricity

(3) use in distribution of electricity (4) (1), (2) and (3) all options

---

6. मूल्यवर्धित कर कायदा 2002 मध्ये व्यापाऱ्यास :

(a) पिनकोडमध्ये बदल झाल्यास नवीन नोंदणी दाखला घेणे आवश्यक आहे.

(b) ट्रस्टच्या ट्रस्टीत बदल झाल्यास नवीन नोंदणी दाखला घेणे आवश्यक आहे.

(c) प्रायव्हेट लिमीटेड कंपनीचे पब्लिक लिमिटेड कंपनीत रूपांतर केल्यास नवीन नोंदणी दाखला घेणे आवश्यक आहे.

(d) पार्टनरशीप फर्मचे प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये रूपांतर केल्यास नवीन नोंदणी दाखला घेणे आवश्यक आहे.

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर

(3) फक्त (d) बरोबर (4) फक्त (c) आणि (d) बरोबर

In Value Added Tax Act 2002, dealer has to obtain new registration :

(a) if there is a change in the pin code.

(b) if there is a change of trustees in a trust.

(c) if private limited company is converted into a public limited company.

(d) if partnership firm is converted into private limited company.

(1) Only (a) is correct (2) Only (b) is correct

(3) Only (d) is correct (4) Only (c) and (d) are correct

---

7. ऐच्छिक नोंदणी दाखला घेतल्यावर, नोंदणी दाखल्याच्या तारखेपासून _________ महिन्यात धंदा सुरु केला नसेल तर विक्रीकर अधिकारी/विभागनियमातील तरतुदीप्रमाणे सदर नोंदणी दाखला रद्द करू शकतील.

(1) 1 (2) 3 (3) 6 (4) 9

If a person after having obtained voluntary registration has not commenced business within _________ months from the date of registration, the sales tax officer/dept. may cancel such a registration.

(1) 1 (2) 3 (3) 6 (4) 9

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

8. "जाहीर केलेला माल" [ कलम 2(9) ] म्हणजे __________ खाली वेळोवेळी जाहीर केलेला माल.
   (1) मुंबई विक्रीकर कायदा, 1959
   (2) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा, 2002
   (3) मध्यवर्ती विक्रीकर कायदा, 1956
   (4) माहिती व तंत्रज्ञान कायदा, 2002

   "Declared goods" [Section.2(9)] means goods as defined from time to time, in the __________.
   (1) Bombay Sales Tax Act, 1959
   (2) Maharashtra Value Added Tax Act, 2002
   (3) Central Sales Tax Act, 1956
   (4) Information Technology Act, 2002

---

9. मूल्य वर्धित कर कायद्याखाली नियमित नोंदणी दाखला घेण्यासाठी शुल्क भरावे लागते का ? असल्यास किती ?
   (1) होय, रुपये 5000/- फक्त (2) होय, रुपये 25/- फक्त
   (3) होय, रुपये 500/- फक्त (4) नाही

   Is there any Fee applicable for regular registration under MVAT, Act ; if yes ; What is the amount ?
   (1) Yes, Rs. 5000/- only (2) Yes, Rs. 25/- only
   (3) Yes, Rs. 500/- only (4) No

---

10. नोंदणी दाखला __________ नमुन्यामध्ये दिला जातो.
   (1) 101 (2) 102 (3) 301 (4) 302

   Registration Certificate is issued in the Form :
   (1) 101 (2) 102 (3) 301 (4) 302

---

11. फेरविक्री म्हणजे :
   (a) माल ज्या स्वरूपात खरेदी केला त्याच स्वरूपात त्याची केलेली विक्री.
   (b) खरेदी केलेल्या मालाची उत्पादन होण्यासाठी काहीही न करता केलेली विक्री.
   (1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर
   (3) (a) आणि (b) दोन्ही बरोबर (4) वरील पैकी काही नाही

   Resale means :
   (a) A sale of purchased goods in the same form in which they were purchased.
   (b) A sale of purchased goods without doing anything amounting to manufacture.
   (1) only (a) is correct (2) only (b) is correct
   (3) (a) and (b) both are correct (4) none of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**12.** मुल्यवर्धित कर कायदयानुसार कर दायित्वास पात्र होण्याकरीता उलाढालीची मर्यादा खालील प्रमाणे आहे :

(1) विक्रीची एकूण उलाढाल रु. 5,00,000

(2) विक्रीची एकूण उलाढाल रु. 1,00,000

(3) विक्रीची एकूण उलाढाल रु. 5,00,000 व करपात्र मालाच्या खरेदीची/विक्रीची उलाढाल रु. 10,000 पेक्षा कमी नाही

(4) विक्रीची उलाढाल रु. 1,00,000 व कर पात्र मालाच्या खरेदी/विक्रीची उलाढाल रु. 10,000 पेक्षा कमी नाही

As per Maharashtra Value Added Tax Act, one is liable to pay tax, when :

(1) Turnover of Sales Rs. 5,00,000

(2) Turnover of Sales Rs. 1,00,000

(3) Total turnover of Sales Rs. 5,00,000 and value of taxable purchase or sale not less than Rs. 10,000

(4) Total turnover of Sales Rs. 1,00,000 and value of taxable purchase or sales not less than Rs. 10,000

---

**13.** कलम 6 मध्ये खालीलपैकी कोणत्या अनुसूचींचा समावेश आहे ?

(1) A, B आणि C (2) A, B, C आणि F (3) B, C आणि D (4) B, C, D आणि E

Which of the following schedules are mentioned in Section 6 ?

(1) A, B and C (2) A, B, C and F (3) B, C, and D (4) B, C, D and E

---

**14.** वॉटर पंपींग आणि वीजनिर्मितीसाठीच्या पवनचक्कीवर व त्याच्या कंपोनंट्स, पार्ट्स आणि ॲक्सेसरीजवर कराचा दर __________ इतका आहे.

(1) 0% (2) 1% (3) 5% (4) 12.5%

Rate of Tax on windmill for water pumping and for generation of electricity and its components, parts and accessories is __________.

(1) 0% (2) 1% (3) 5% (4) 12.5%

---

**15.** कलम 2(8) नुसार "व्यापारी" म्हणजे :

(1) अडत्या किंवा अभिकर्ता (2) शेतकरी

(3) वाहतुकदार (4) शैक्षणिक संस्था

For the purpose of section 2(8) "dealer" means :

(1) marcantile agent (2) agriculturist

(3) transporter (4) educational institution

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

16. आयातदाराच्या नोंदणीसाठी उलाढालीची मर्यादा किती असते ?

(a) आयात फक्त रु. पाच लाखापेक्षा जास्त असली पाहिजे.

(b) आयातीची मर्यादा नाही.

(c) मालाची विक्री रु. एक लाखापेक्षा जास्त असली पाहिजे.

(d) करपात्र मालाची खरेदी किंवा विक्री रु. दहा हजार पेक्षा जास्त असली पाहिजे.

(1) फक्त (a) बरोबर

(2) फक्त (a) आणि (d) बरोबर

(3) फक्त (c) बरोबर

(4) (c) आणि (d) एकत्रित बरोबर

For Registration of an importer what is the turnover limit ?

(a) Only import should be more than Rs. Five lakh

(b) No limit of import

(c) Sale of goods should be more than Rs. One lakh

(d) Sale or purchase of taxable goods should be more than Rs. Ten thousand

(1) only (a) is correct

(2) only (a) and (d) are correct

(3) only (c) is correct

(4) (c) and (d) together are correct

---

17. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा नियम - 2005 मधील नियम 2(1)(ड) मध्ये "आयुक्त" यामध्ये यांचा समावेश होतो :

(1) अपर आयुक्त

(2) सह आयुक्त

(3) आयुक्तांनी ज्यांना अधिकार प्रदान केलेले आहेत असे अधिकारी

(4) वरील सर्व पर्याय

As per rule 2(1)(d) of the Maharashtra Value Added Tax, Rules - 2005 "Commissioner" includes :

(1) Additional Commissioner

(2) Joint Commissioner

(3) Officers to whom Commissioner delegates his powers

(4) All the above

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

18. नियम 11(1) नुसार नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी अर्ज करावा लागण्याचा नमुना क्रमांक :

(1) 103 (2) 105

(3) 102 (4) कंपनीच्या लेटरहेडवर केलेला अर्ज

As per rule 11(1) an application for cancellation of registration is to be made in Form No. :

(1) 103 (2) 105

(3) 102 (4) Application on company letter head.

---

19. ''कायदा'' या शब्दाची व्याख्या महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदा नियम – 2005 मधील कोणत्या नियमामध्ये आहे ?

(1) नियम 2(1) (अ) (2) नियम 2(1) (फ) (3) नियम 2(1) (क) (4) नियम 2(1) (ई)

In which of the Maharashtra Value Added Tax, Rules (2005) the "Act" has been defined ?

(1) Rule 2(1) (a) (2) Rule 2(1) (f) (3) Rule 2(1) (c) (4) Rule 2(1) (e)

---

20. कलम 9 नुसार अनुसुचीमध्ये सुधारणा करण्याचे अधिकार कोणास आहेत ?

(1) विक्रीकर आयुक्त (2) विक्रीकर लवाद

(3) राज्य शासन (4) केंद्र शासन

According to Section-9 which authority is empowered to amend the schedule ?

(1) Commissioner of Sales Tax (2) Sales Tax Tribunal

(3) State Government (4) Central Government

---

21. ''निर्मिती'' मध्ये कशाचा समावेश होतो ?

(1) उत्पादन करणे (2) अर्क काढणे (3) सुशोभित करणे (4) वरील सर्व

"Manufacture" includes :

(1) Producing (2) Extracting (3) Ornamenting (4) All the above

---

22. व्यापाऱ्याच्या खरेदीविक्रीच्या करपात्र उलाढालीची मर्यादा ठरवण्याची तरतुद मूल्यवर्धित करकायद्याच्या कोणत्या कलमामध्ये नमूद आहे :

(1) कलम 3 (2) कलम 6 (3) कलम 7 (4) कलम 8

To determine the incidence of tax, limit of sales/purchase turnover is provided in section :

(1) Section-3 (2) Section-6 (3) Section-7 (4) Section-8

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

23. इंडस्ट्रीज अ‍ॅक्ट 1951 मधील कलम 14 प्रमाणे केंद्राने स्थापित केलेल्या बोर्डाने मान्यता दिलेले आणि ज्याला कमिशनरनी मान्यता दिली आहे असे म्हणजे :

(1) स्पेशल इकॉनॉमिक झोन
(2) एक्स्पोर्ट ओरिएन्टेड युनिट
(3) सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क
(4) इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर टेक्नॉलॉजी पार्क

What has been approved by the Board appointed by the Central Govt. u/s 14 of Industries Act 1951 and that has been certified by the Commissioner ?

(1) Special Economic Zone
(2) Export Oriented Unit
(3) Software Technology Park
(4) Electronic Hardware Technology Park

---

24. जोड्या जुळवा :

| **नमुना क्र.** | | | **कारण** |
|---|---|---|---|
| (अ) | 101 | (i) | नोंदणी दाखला रद्द करण्यासाठी |
| (ब) | 102 | (ii) | नवीन नोंदणी दाखला घेण्यासाठी |
| (क) | 103 | (iii) | नोंदणी दाखल्याचे प्रमाणपत्र |
| (ड) | 108 | (iv) | जुना मुं.वि.का.चा नोंदणी दाखला परत करून सरल TIN घेण्यासाठी |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (iv) | (i) | (iii) | (ii) |

Match the following :

| **Form No.** | | | **Reason** |
|---|---|---|---|
| (a) | 101 | (i) | to cancel registration |
| (b) | 102 | (ii) | to apply for new registration |
| (c) | 103 | (iii) | certificate of registration |
| (d) | 108 | (iv) | to surrender old registration certificates and obtain direct TIN |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (iv) | (i) | (iii) | (ii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**25.** कलम 8 नुसार खालील कोणत्या प्रकारच्या खरेदी किंवा विक्री व्यवहारामध्ये मालाच्या खरेदी किंवा विक्रीवर कर आकारला जात नाही :

(1) राज्याबाहेरील खरेदी किंवा विक्री
(2) माल आयात किंवा निर्यात करण्याच्या ओघात
(3) आंतरराज्यीय व्यवहाराच्या ओघात
(4) वरील सर्व

Under Section-8 no tax is leviable on the sales and purchases of any goods, where such sales or purchases take place :

(1) Outside the state
(2) In the course of import or export
(3) In the course of Interstate trade or commerce
(4) All of the above

---

**26.** महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा 2002 च्या कोणत्या कलमानुसार नोंदणी दाखला रद्द होईपर्यंत व्यापाऱ्याचे करदायित्व बंद होत नाही ?

(1) कलम 3(1) (2) कलम 3(3) (3) कलम 3(4) (4) कलम 3(5)

Under which Section of the Maharashtra Value Added Tax, 2002 liability to pay tax continues until his registration is cancelled :

(1) Section 3(1) (2) Section 3(3) (3) Section 3(4) (4) Section 3(5)

---

**27.** विक्रीची मर्यादा ओलांडल्यानंतर खालीलपैकी किती दिवसात व्यापाऱ्यास नोंदणी घेणे बंधनकारक/आवश्यक आहे ?

(1) 15 दिवस (2) 30 दिवस (3) 45 दिवस (4) 60 दिवस

In how many days a dealer has to obtain Registration, when he crosses the limit of turnover of sales ?

(1) 15 days (2) 30 days (3) 45 days (4) 60 days

---

**28.** काही मालाच्या बाबतीत कर आकारला जात नाही अशा मालाचा समावेश कोणत्या परिशिष्टात आहे ?

(1) परिशिष्ट A (2) परिशिष्ट B (3) परिशिष्ट C (4) परिशिष्ट D

In which schedule are the goods on the sale of which tax is not leviable, are specified ?

(1) Schedule A (2) Schedule B (3) Schedule C (4) Schedule D

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

29. मूल्यवर्धित कर कायदा, नियम 3 नुसार माल परत करण्याचा व अनामत रकमेचा परतावा करण्याचा कालावधी, तो माल खरेदी किंवा विक्री झाल्यापासून किती असतो ?

(1) 3 महिने (2) 6 महिने (3) 9 महिने (4) 1 महिना

As per rule 3 of the MVAT Act, what is the period for return of the goods and refund of the deposit from the date of sale or purchase of the said goods ?

(1) 3 months (2) 6 months (3) 9 months (4) 1 month

---

30. मुल्यवर्धित कर कायद्यानुसार या कायद्याअंतर्गत कर म्हणजे __________

(1) विक्रीकर, देय रक्कम
(2) विक्रीकर, खरेदी कर, कराचा आपस मेळ
(3) विक्रीकर, खरेदी कर
(4) विक्रीकर आणि कराचा आपस मेळ

As per MVAT Act 'tax' means __________ under this Act,

(1) Sales tax ; payable amount by way of tax.
(2) Sales tax, purchase tax, amount payable by way of composition.
(3) Sales tax ; purchase tax.
(4) Sales tax and composition tax.

---

31. उपआयुक्त किंवा जेष्ठ उपआयुक्त यांनी शास्ती लावताना शास्तीची रक्कम रु. दहा लाखापेक्षा अधिक असल्यास कलम __________ प्रमाणे सहआयुक्तांची परवानगी घ्यावी लागेल.

(1) 29 (12)(b) (2) 29 (11)(c) (3) 29 (10)(a) (4) 29 (9)(c)

When a penalty exceeding Rs. Ten Lakh is being levyied by a Deputy Commissioner or a Senior Deputy Commissioner of Sales Tax, prior permission of Joint Commissioner is necessary under section :

(1) 29 (12)(b) (2) 29 (11)(c) (3) 29 (10)(a) (4) 29 (9)(c)

---

32. महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदा 2002 च्या कलम 20 नुसार कोणताही मजकूर वगळल्याचे व्यापाऱ्याच्या निदर्शनास आल्यानंतर सुधारीत विवरणपत्र दाखल करण्याचा कालावधी किती आहे ?

(1) दहा महिने (2) नऊ महिने (3) सहा महिने (4) आठ महिने

Under Section 20 of MVAT Act 2002, what is the time limit to file revised returen by the dealer if he discovers any omission ?

(1) Ten Months (2) Nine Months (3) Six Months (4) Eight Months

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

33. ज्या आर्थिक वर्षात आदेश पारित केला असेल त्यानंतर किती वर्षानंतर पुनर्विलोकन आदेश कलम 25 नुसार पारित करता येत नाही ?

(1) दोन वर्षे (2) पाच वर्षे (3) चार वर्षे (4) तीन वर्षे

Review order u/s 25 cannot be passed after an expiry of a period of how many years from the end of the financial year in which the order is passed ?

(1) Two years (2) Five years (3) Four years (4) Three years

---

34. अधिसूचित तेल कंपन्यानी नियम 17 नुसार कोणत्या नमुन्यात विवरणपत्र दाखल केले पाहिजे ?

(1) 234 (2) 231 (3) 233 (4) 235

In which form Notified Oil Companies shall file their return under Rule 17 ?

(1) 234 (2) 231 (3) 233 (4) 235

---

35. व्यापाऱ्याच्या मृत्यूनंतर धंदा हस्तांतरणाच्या नोंदणी दाखल्या करिता अर्ज करण्याचा कालावधी __________.

(1) 15 दिवस (2) 30 दिवस (3) 45 दिवस (4) 60 दिवस

The time limit for MVAT Registration applications, in the case of "Transfer of business due to the death of the dealer" is __________.

(1) 15 days (2) 30 days (3) 45 days (4) 60 days

---

36. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायद्याच्या कलम 30 खाली व्याज लावताना व्यापाऱ्यास नोटिस देण्याची आवश्यकता आहे काय ?

(1) होय (2) अधिकाऱ्याच्या अधिकारांतर्गत
(3) नाही (4) वरीलपैकी नाही

For levy of interest under Section 30 of MVAT Act is it necessary to give dealer a notice ?

(1) Yes (2) Officers authority
(3) No (4) None of the above

---

37. मुल्यवर्धीत करकायदा 2002 नुसार जप्त करण्यात आलेल्या रकमा कोणत्या निधीत जमा करण्यात येतात ?

(1) आकस्मिकता निधी
(2) मुख्यमंत्री सहायता निधी
(3) पंतप्रधान सहायता निधी
(4) महाराष्ट्र ग्राहक संरक्षण व मार्गदर्शन निधी

In which fund are the amounts forfeited under MVAT Act 2002 deposited ?

(1) Emergency Fund
(2) Chief Ministers Relief Fund
(3) Prime Ministers Relief Fund
(4) The Maharashtra Consumer Protection and Guidance Fund

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

38. 'डिफेक्ट नोटीस' कोणत्या नमूऩ्यात काढली जाते ?

(1) फार्म 210 (2) फार्म 211 (3) फार्म 212 (4) फार्म 213

'Defect Notice' is issued in __________.

(1) Form 210 (2) Form 211 (3) Form 212 (4) Form 213

39. कलम 30 (4) अंतर्गत देय व्याज किती ?

(1) अतिरिक्त देय कराच्या पन्नास टक्के

(2) अतिरिक्त देय कराच्या वीस टक्के

(3) अतिरिक्त देय कराच्या तीस टक्के

(4) अतिरिक्त देय कराच्या पंचवीस टक्के

How much interest is payable u/s 30 (4) ?

(1) Fifty percent of additional tax payable

(2) Twenty percent of additional tax payable

(3) Thirty percent of additional tax payable

(4) Twenty Five Percent of additional tax payable

40. कलम 26 नुसार ''अॅडमिशन मेमो-कम-स्टे ऑर्डर'' कोणत्या नमुन्यात पारित करतात ?

(1) नमुना 310 (2) नमुना 311 (3) नमुना 312 (4) नमुना 313

In which form the "admission-memo-cum-stay order" u/s 26 is passed ?

(1) Form 310 (2) Form 311 (3) Form 312 (4) Form 313

41. नोंदणीकृत व्यापाऱ्याने कर भरण्यास उशीर केला तर त्याला __________ या दराने व्याज भरावे लागते.

(1) प्रति माह 1% (2) प्रति माह 1.25%

(3) प्रति माह 1.5% (4) प्रति माह 2%

The rate of interest payable on late payment of tax by Registered dealer is __________.

(1) 1% per month (2) 1.25% per month

(3) 1.5% per month (4) 2% per month

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

42. कलम 29(7) नुसार व्यापाऱ्याने नोटिसीचे अनुपालन करण्यात कसूर केली असेल तर त्याच्यावर किती शास्ती लादता येते ?

(1) पाच हजार रुपये (2) दहा हजार रुपये
(3) एक हजार रुपये (4) पंचवीस हजार रुपये

Under Section 29(7) if dealer fails to comply with any notice, how much penalty can be imposed on him ?

(1) Five Thousand Rupees (2) Ten Thousand Rupees
(3) One Thousand Rupees (4) Twenty Five Thousand Rupees

---

43. व्यापाऱ्याच्या विवरणाची वारंवारिता ठरविताना करदायित्व म्हणजे :

(1) चालू वर्षातील महाराष्ट्र मुल्यवर्धित कर आणि केंद्रीय विक्रीकर मिळून एकूण करदायित्व
(2) चालू वर्षातील महाराष्ट्र मुल्यवर्धित कर आणि केंद्रीय विक्रीकर मिळून निव्वळ करदायित्व
(3) मागील वर्षातील महाराष्ट्र मुल्यवर्धित कर आणि केंद्रीय विक्रीकर मिळून एकूण करदायित्व
(4) मागील वर्षातील वजावट व परतावा समायोजित केल्यानंतर महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदा आणि केंद्रीय विक्रीकर कायद्यान्वये राज्यातील त्याच्या धंद्याच्या सर्व ठिकाणासंबंधात देय असलेल्या सर्व करांची एकूण रक्कम

The tax liability for the purpose of determining the periodicity of return would mean __________.

(1) Gross Tax liability under MVAT Act and CST Act of the current year.
(2) Net Tax liability under MVAT Act and CST Act of the current year.
(3) Gross Tax liability under MVAT Act and CST Act of the previous year.
(4) All taxes payable by a dealer in respect of all places of business in the state under the MVAT Act and CST Act after adjusting of set-off and refund in the previous year.

---

44. खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) पराकाष्ठा निर्णयशक्तीनुसार कलम 23(2), 23 (3) किंवा 23(4) खाली पारित केलेला निर्धारणा आदेश कलम 23(11) नुसार रद्द करता येतो.
(2) कलम 23(5) खाली पारित केलेला निर्धारणा आदेश कलम 23(11) नुसार रद्द करता येतो.
(3) कलम 23(6) खाली पारित केलेला निर्धारणा आदेश कलम 23(11) नुसार रद्द करता येतो.
(4) कलम 23(8) खाली पारित केलेला निर्धारणा आदेश कलम 23(11) नुसार रद्द करता येतो.

Which of the following statements is true ?

(1) Best judgement assessment order passed u/s 23(2), 23 (3) or 23(4) can be cancelled u/s 23(11)
(2) Assessment order passed u/s 23(5) can be cancelled u/s 23(11)
(3) Assessment order passed u/s 23(6) can be cancelled u/s 23(11)
(4) Assessment order passed u/s 23(8) can be cancelled u/s 23(11)

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

45. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002, कलम 32(5) च्या तरतुदीनुसार, कलम 32(4) ची नोटिस बजावण्यात आल्यानंतर, भरावयाचा राहिलेला कोणताही कर, शास्ती, व्याज, दंड इ. रक्कम __________ ची थकबाकी म्हणून वसूली योग्य असेल.

(1) राज्य महसूल (2) ग्राहक निधी
(3) जमीन महसूल (4) विक्रीकर महसूल

As per section 32(5) of MVAT, Act, 2002, any tax, penalty, interest, fine which remains unpaid after the service of notice u/s 32(4), is recoverable as arrears of __________.

(1) State Revenue (2) Consumer Fund
(3) Land Revenue (4) Sales Tax Revenue

---

46. जर विवरण पत्रक परिपूर्ण किंवा स्वयंसुसंगत नसेल तर आयुक्त, विवरण सादर केल्याच्या दिनांकापासून __________ कालावधीपूर्वी व्यापाऱ्यावर विहित नमुन्यात दोषासंबंधी नोटीस बजावतील :

(1) एक वर्ष (2) तीन वर्ष (3) चार महिने (4) नऊ महिने

If the return filed by a dealer is not correct or complete, the Commissioner may serve on the dealer a Defect notice in writing within __________ of the receipt of the return.

(1) One year (2) Three years (3) Four months (4) Nine months

---

47. आर्थिक वर्ष 2011-12 मध्ये व्यापाऱ्याचे करदायित्व रु. 100000/- इतके आहे. आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये व्यापाऱ्याने कोणते विवरणपत्र दाखल करणे गरजेचे आहे ?

(1) मासिक (2) त्रैमासिक (3) अर्धवार्षिक (4) वार्षिक

Tax liability of a dealer for F.Y. 2011-12 is Rs. 100000/- which return will he have to file for F.Y. 2012-13 ?

(1) Monthly (2) Quarterly (3) Half yearly (4) Yearly

---

48. मुल्यवर्धित कर कायदा 2002 च्या कोणत्या कलमाद्वारे कराची थकबाकी वसूल करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत :

(1) 33 (2) 34 (3) 35 (4) 38

Under which section of MVAT Act 2002, powers have been given to recover arrears of sales tax dues under the land revenue code ?

(1) 33 (2) 34 (3) 35 (4) 38

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**49.** कलम 35(5) नुसार पारित केलेल्या आदेशाविरुध्द खालीलपैकी कोणाकडे अपील सादर केले जाते ?

(1) विक्रीकर उपआयुक्त (2) विक्रीकर सहआयुक्त

(3) विक्रीकर आयुक्त (4) महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण (ट्रिब्यूनल)

An appeal against any order passed under Section 35(5), shall lie with ________.

(1) Deputy Commissioner of Sales Tax (2) Joint Commissioner of Sales Tax

(3) Commissioner of Sales Tax (4) Maharashtra Sales Tax Tribunal

---

**50.** व्यापाऱ्याने देय असलेली कोणतीही रक्कम नोटिस बजावल्याच्या दिनांकापासून किती दिवसात भरली पाहिजे ?

(1) 60 (2) 90 (3) 45 (4) 30

Within how many days the dealer has to pay amount due from the date of service of the notice ?

(1) 60 (2) 90 (3) 45 (4) 30

---

**51.** नियम 17 नुसार जो व्यापारी फेरविक्रेता आहे व ज्याने आपसमेळ योजना घेतली आहे त्याच्या विवरणाचा कालावधी काय आहे ?

(1) मासिक (2) अर्धवार्षिक (3) त्रैमासिक (4) यापैकी नाही

What is the periodicity of return under Rule 17 for a dealer who is a retailer and opted for composition ?

(1) Monthly (2) Half yearly (3) Quarterly (4) None of the above

---

**52.** खालीलपैकी कोणते व्यापारी नमुना 234 मध्ये विवरण दाखल करतात ?

(1) मद्य व्यापारी

(2) कार्य कंत्राटदार

(3) सामूहिक प्रोत्साहन योजनेचे व्यापारी, जे हक्कधारी प्रमाणपत्र धारक आहेत

(4) आपसमेळ व्यापारी

Who are required to file returns in Form 234 ?

(1) Liquor Dealers

(2) Works Contractors

(3) Dealers under Package Scheme of Incentives (PSI), holding Entitlement Certificate

(4) Composition Dealer

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

53. महाराष्ट्र मूल्यवर्धीत कर अधिनियम, 2002, कलम 26 नुसार, दुसरे अपील __________ येथे करता येईल.

(1) विक्रीकर आयुक्त (2) राज्य शासन
(3) महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण (4) उच्च न्यायालय

A second appeal under Section 26 of MVAT, Act, 2002, shall only be filed with the __________.

(1) Commissioner of Sales Tax (2) State Government
(3) Maharashtra Sales Tax Tribunal (4) High Court

---

54. कलम 23 च्या पोटकलम (1) अन्वये दिलेला निर्धारणा आदेश रद्द करण्यासाठी करावयाचा अर्ज __________ मध्ये असेल.

(1) नमुना - 303 (2) नमुना - 304 (3) नमुना - 305 (4) नमुना - 306

The application for cancellation of assessment order under sub-Section (1) of Section (23) shall be in :

(1) Form - 303 (2) Form - 304 (3) Form - 305 (4) Form - 306

---

55. म.मू.व. कर अधि. 2002, कलम 35 अन्वये, तात्पुरती जप्ती करण्याचे अधिकार, खालीलपैकी कोणास प्रदान केलेले नाहीत :

(1) विक्रीकर सह आयुक्त
(2) विक्रीकर उप आयुक्त
(3) अपर विक्रीकर आयुक्त
(4) विक्रीकर आयुक्त

Which of the following authorities can not exercise powers of provisional attachment u/s 35 of MVAT Act, 2002 ?

(1) Joint Commissioner of Sales Tax
(2) Dy. Commissioner of Sales Tax
(3) Additional Commissioner of Sales Tax
(4) Commissioner of Sales Tax

---

56. कलम 29 पोट कलम (11) अन्वये शास्ती लावणारा कोणताही आदेश उक्त कालावधीचा अंतर्भाव असलेले वर्ष संपल्यापासून __________ वर्षात पारित करावा लागतो.

(1) दोन (2) चार (3) सहा (4) आठ

As per the provisions of Section 29 sub Section (11), the penalty order for the said period should be passed within a period of __________ years from the year in which the said period ended.

(1) two (2) four (3) six (4) eight

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

57. कलम 32(8) नुसार, अर्ज प्राप्त झाल्यापासून किती दिवसात ''क्लिअरन्स सर्टीफीकेट'' दिले पाहिजे ?

(1) 15 दिवस (2) 21 दिवस (3) 30 दिवस (4) 60 दिवस

"Clearance Certificate" u/s 32(8), is issued within __________ days from the date of receipt of the application.

(1) 15 days (2) 21 days (3) 30 days (4) 60 days

---

58. कोणत्याही व्यापाऱ्याने नोंदणीसाठी अर्ज करण्यात कसूर केली आणि तो कर भरण्यास पात्र असेल तर त्यास कराव्यतिरिक्त कलम __________ अन्वये सरळव्याज लावता येते.

(1) 30 (3) (2) 30 (1) (3) 30 (2) (4) 30 (4)

A dealer who is liable to pay tax and failed to apply for registration, the simple interest in addition to amount of tax can be levied under section __________.

(1) 30 (3) (2) 30 (1) (3) 30 (2) (4) 30 (4)

---

59. तिमाही विवरणपत्रक खालीलपैकी कोणी दाखल करणे आवश्यक आहे ?

(1) नवनोंदित व्यापारी (2) धंदा बंद झालेल्या व्यापाऱ्याचे शेवटचे विवरणपत्रक

(3) पॅकेज स्कीमचा व्यापारी (4) वरील सर्व

Who should file Quarterly return ?

(1) New Registered Dealer (2) Business Discontinued dealer's last return

(3) Package scheme dealer (4) All of the above

---

60. खालीलपैकी कोणत्या कलमानुसार व्यापाऱ्याने विवरणपत्र दाखल करण्यात कसूर केली असेल तर नोटीस न देता निर्धारणा पराकाष्ठा प्रक्रिया निर्णयशक्तीनुसार पूर्ण करता येते ?

(1) 23 (1) (2) 23 (3) (3) 23 (6) (4) 23 (5)

Under which of the following sections assessment can be completed to the best of judgement without serving a notice to the dealer if he fails to file return ?

(1) 23 (1) (2) 23 (3) (3) 23 (6) (4) 23 (5)

---

61. व्यापाऱ्याने त्याच्या धंद्याबाबत खोटे विवरणपत्रक दाखल केल्यास त्याला कोणत्या कलमानुसार शिक्षा होते ?

(1) कलम 74 (1)(a) (2) कलम 74 (2)

(3) कलम 74 (1)(b) (4) कलम 74 (3)(d)

If a dealer furnishes a false return regarding his business knowingly then under which section of MVAT, Act is he punishable ?

(1) Section 74 (1)(a) (2) Section 74 (2)

(3) Section 74 (1)(b) (4) Section 74 (3)(d)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

62. एखाद्या व्यापाऱ्याने त्याच्या एकूण विक्रीच्या उलाढालीपैकी किती विक्री, स्वत: व्यापारी नसलेल्या लोकांना केली तर तो किरकोळ धंदा करणारा व्यापारी ठरेल ?

(1) एकूण उलाढालीपैकी 6/10 विक्री
(2) एकूण उलाढालीपैकी 7/10 विक्री
(3) एकूण उलाढालीपैकी 8/10 विक्री
(4) एकूण उलाढालीपैकी 9/10 विक्री

A dealer is regarded as a retailer if his turnover of sales made to persons who are not dealers themselves is :

(1) 6/10 of his total turnover of sales
(2) 7/10 of his total turnover of sales
(3) 8/10 of his total turnover of sales
(4) 9/10 of his total turnover of sales

63. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा (2002) च्या अंतर्गत कराचा दर दर्शविणारी किती परिशिष्टे आहेत ?

(1) 3 (2) 4 (3) 5 (4) 6

How many tax schedules are there (under MVAT Act 2002) showing different tax rates ?

(1) 3 (2) 4 (3) 5 (4) 6

64. करमुक्त मालाच्या उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या खरेदीवर मिळणाऱ्या वजावटीतील कपात लागू असणार नाही, जर :

(1) मालाची विक्री राज्याबाहेर परंतु भारतात केली गेली असेल.
(2) मालाची विक्री सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत पात्र घटकास (युनीट) केली गेली असेल.
(3) मालाची निर्यात भारताबाहेर केली गेली असेल.
(4) मालाची विक्री राज्यात केली गेली असेल.

Reduction in set-off on the purchases used for manufacturing of tax free goods is not applicable if :

(1) the goods are sold outside state but within India
(2) the goods are sold to the unit eligible under package scheme of incentives
(3) the goods are exported outside India
(4) the goods are sold locally

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**65.** महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायद्यातील कलम 74 (1) नुसार खालीलपैकी कोणता गुन्हा नाही ?

(1) खोटे विवरणपत्र देणे

(2) या अधिनियमाखालील कोणतेही खोटे प्रमाणपत्र कोणत्याही व्यक्तीस देणे

(3) आयुक्त किंवा न्यायाधिकरणापुढे खोटी कागदपत्रे देणे

(4) विवरणपत्र देण्यात कसूर करणे

Which of the following is not an offence u/s 74 (1) of the MVAT Act ?

(1) To furnish a false return

(2) To issue any person any false certificate under the Act

(3) To produce, before the Commissioner or Tribunal, a false document

(4) Not to furnish a return

---

**66.** महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदयाच्या कलम 74(2) अंतर्गत गुन्हा सिद्ध झाल्यास वॅट (VAT) कायद्याखाली भरावयाचा कर चुकविण्याचा प्रयत्न करणे किंवा कर, दंड, चुकविल्यास कोणत्या शिक्षेची तरतूद केलेली आहे ?

(1) कमीतकमी तीन महिने सक्तमजुरी

(2) कमीतकमी 6 महिने सक्तमजुरी

(3) कमीतकमी 3 महिने व जास्तीत जास्त 1 वर्ष सक्तमजुरी

(4) कमीतकमी 3 महिने व जास्तीत जास्त 1 वर्ष सक्तमजुरी व दंड

What is the punishment prescribed on conviction under Section 74(2) for willfully evading tax or payment of tax, penalty and interest ?

(1) Rigorous imprisonment for a minimum of 3 months

(2) Rigorous imprisonment for a minimum of 6 months

(3) Rigorous imprisonment for a minimum of 3 months to a maximum of one year

(4) Rigorous imprisonment for a minimum of 3 months to a maximum of one year with fine

---

**67.** जी कोणतीही व्यक्ती जाणीवपूर्वक खोटी विवरणपत्रे देईल, तिला महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 च्या अन्वये कमीत कमी किती मुदतीची शिक्षा होईल ?

(1) एक महिना (2) तीन महिने (3) सहा महिने (4) एक वर्ष

If someone furnishes false returns, what will be his minimum term of punishment as per the Maharashtra Value Added Tax Act, 2002 ?

(1) one month (2) three months (3) six months (4) one year

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

68. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायद्याखालील कलम 86 नुसार कराच्या बीजकाची प्रत, ज्या वर्षात विक्री करण्यात आली असेल, त्या वर्षाच्या समाप्तीपासून __________ वर्षांसाठी स्वत:जवळ ठेवून घेता येईल.

(1) 5 (2) 3 (3) 7 (4) 8

Section 86 of MVAT Act provides to retain a copy of tax invoice for __________ years from the end of the year in which sale took place.

(1) 5 (2) 3 (3) 7 (4) 8

---

69. चालू वर्षाच्या आपसमेळाचा लाभ घेण्यासाठी बेकरी व्यापाऱ्याच्या बाबतीत बेकरी उत्पादनाच्या विक्रीची उलाढाल रु. __________ पेक्षा अधिक असू नये.

(1) रु. 10 लाख (2) रु. 20 लाख (3) रु. 50 लाख (4) रु. 40 लाख

The turnover of sale of bakery products should not have exceeded Rs. __________ if a bakery dealer wants to avail the benefit of composition in current year.

(1) Rs. 10 lakh (2) Rs. 20 lakh (3) Rs. 50 lakh (4) Rs. 40 lakh

---

70. म.मू.कर कायदा 2002 च्या कलम 42 अन्वये कराचा आपसमेळ स्वीकारणारे खालीलपैकी कोणते व्यापारी म.मू. कर नियम 2005 नुसार खरेदीवर वजावट घेण्यास पात्र नाहीत ?

(a) मालाचा किरकोळ फेरविक्रेता (b) उपहारगृहाचा मालक

(c) हॉटेलचा मालक (d) कार्यकंत्राटदार

(1) फक्त (a) (2) (a), (b) आणि (c)

(3) फक्त (d) (4) (a), (b), (c) आणि (d)

Which of the following dealers, who have opted for composition of tax u/s 42 of MVAT Act, 2002, is/are not eligible to claim set off on the purchases under MVAT Rules, 2005 ?

(a) Retailer (b) Restaurateur

(c) Hotelier (d) Works contractor

(1) Only (a) (2) (a), (b) and (c)

(3) Only (d) (4) All the four (a), (b), (c) and (d)

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**71.** म.मू. कर अधिनियम 2002 चे कलम 64(2) पुढीलपैकी कशाच्या बाबतीत भाष्य करते ?

(1) झडतीचे व जप्तीचे अधिकार

(2) हिशोबाच्या नोंदवह्या, सर्व माल इ. निरीक्षणासाठी खुली ठेवण्याची व्यापाऱ्याची जबाबदारी

(3) वरील पैकी दोन्ही

(4) वरील पैकी एकही नाही

What does Section 64(2) of MVAT Act 2002 provide for ?

(1) Powers of search and seizure

(2) Responsibility of dealer to furnish all books, goods etc. for inspection purpose

(3) Both the above

(4) None of the above

---

**72.** म.मू. कर कायदा, 2002 च्या कलम 86 (3) अन्वये खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत कर भरण्यास पात्र व्यापाऱ्याने विक्रीचे देयक किंवा रोखीचे ज्ञापन देणे आवश्यक नाही ?

(1) जेथे कोणत्याही एकाच व्यवहारामध्ये विक्री करण्यात आलेल्या मालाचे मूल्य पन्नास रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल

(2) जेथे कोणत्याही एकाच व्यवहारामध्ये विक्री करण्यात आलेल्या मालाचे मूल्य पाचशे रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल

(3) जेथे कोणत्याही एकाच व्यवहारामध्ये विक्री करण्यात आलेल्या मालाचे मूल्य शंभर रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल

(4) जेथे कोणत्याही एकाच व्यवहारामध्ये विक्री करण्यात आलेल्या मालाचे मूल्य एक हजार रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल

In which of the following conditions as per the provisions of Section 86 (3) of MVAT Act, 2002, it is not necessary for the dealer liable to pay tax to issue bill or cash memorandum ?

(1) Where the value of the goods sold in a single transaction is rupees fifty or less

(2) Where the value of the goods sold in a single transaction is rupees five hundred or less

(3) Where the value of the goods sold in a single transaction is rupees one hundred or less

(4) Where the value of the goods sold in a single transaction is rupees one thousand or less

---

**73.** म.मू.कर नियम 77 मध्ये खालीलपैकी कोणता फॉर्म (नमुना) नमूद आहे ?

(1) कर बीजकावर छापण्याच्या प्रमाणपत्राचा नमुना

(2) विविध विवरणपत्राचा नमुना

(3) निर्धारणा नोटीस नमुना

(4) निर्धारणा आदेश नमुना

What does Rule 77 of MVAT Rules provide for ?

(1) Certificate to be printed on tax-invoice

(2) Forms of various returns

(3) Form of notice of assessment

(4) Form of assessment order

---

**74.** लोखंड व पोलाद विक्रीवरील 5% दर हा कोणत्या तारखेपासून लागू आहे ?

(1) 1.4.2010 (2) 1.5.2011 (3) 1.5.2012 (4) 1.4.2011

Rate of tax of 5% on sale of Iron and steel is applicable from which date ?

(1) 1.4.2010 (2) 1.5.2011 (3) 1.5.2012 (4) 1.4.2011

---

**75.** __________ ला आपसमेळ योजना लागू होईल.

(1) उत्पादक (2) आयातदार

(3) निर्यातदार (4) मंडप व्यवस्था पाहणारा व्यापारी

The composition scheme is applicable to __________.

(1) Manufacturer (2) Importer

(3) Exporter (4) Mandap keeper

---

**76.** जर कोणतीही व्यक्ती म.मू. कर कायदा, 2002 च्या कलम 74(1) ते 74(4) अन्वये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही कृत्ये करीत असेल आणि या पोट कलमांच्या कोणत्याही तरतुदीखालील अपराध करण्याचे तिने चालू ठेवले असेल तर कलम 74 (5) अन्वये द्रव्यदंडाची किती शिक्षा आहे ?

(1) दर दिवसाला शंभर रुपयांहून कमी नसेल इतका द्रव्यदंड

(2) दर दिवसाला एक हजार रुपयांहून कमी नसेल इतका द्रव्यदंड

(3) दर महिन्याला शंभर रुपयांहून कमी नसेल इतका द्रव्यदंड

(4) दर महिन्याला एक हजार रुपयांहून कमी नसेल इतका द्रव्यदंड

Whoever commits any of the offences specified in Section 74(1) to (4) of MVAT Act, 2002 and continues to do so what fine can be imposed as per Section 74 (5) ?

(1) Not less than rupees one hundred daily

(2) Not less than rupees one thousand daily

(3) Not less than rupees one hundred monthly

(4) Not less than rupees one thousand monthly

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

77. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, 2005 च्या नियम 52 नुसार व्यापाऱ्यास कोणत्या रकमेची वजावट दिली जात नाही ?
(1) नोंदणीकृत व्यापाऱ्याकडून केलेली अशी खरेदी जिच्यावर वेगळा कर गोळा करण्यात आला आहे.
(2) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रामध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, 1987 अन्वये दिलेला कर.
(3) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांत मालाच्या प्रवेशावर कर अधिनियम, 2002 अन्वये दिलेला कर.
(4) महाराष्ट्र ऐषआराम कर अधिनियम, 1987 अन्वये दिलेला कर.

Which amount is not granted to a dealer as set off as per Rule 52 of MVAT Rules, 2005 ?
(1) purchase from registered dealer on which tax is collected separately
(2) tax paid under Maharashtra tax on Entry of Motor Vehicles into Local Areas Act, 1987
(3) tax paid under Maharashtra tax on Entry of Goods into Local Areas Act, 2002
(4) tax paid under Maharashtra tax on Luxuries Act, 1987

---

78. कॉम्पोझिशन स्किमखाली बेकर्सना कोणत्या अटी लागू होतात ?
(1) पहिल्या 50 लाखाच्या विक्रीवर कराचा दर 4% (नोंदित व्यापारी)
(2) अनोंदित व्यापाऱ्याला विक्रीवर कराचा दर 6%
(3) उर्वरित उलाढालीवर परिशिष्यानुसार कराचा दर
(4) वरील सर्व

What are the conditions applicable to bakers under the composition scheme ?
(1) Rate is @ 4% on $1^{st}$ 50 lakh turnover for Registered Dealers
(2) 6% in case of Un-registered Dealers
(3) On balance turnover as per schedule rate
(4) All the above

---

79. म.मु. कर कायद्याच्या कुठल्या कलमान्वये व्यापारी त्याने खरेदी केलेल्या मालावर भरलेल्या कराची वजावट मागू शकतो ?
(1) 42 (2) 44 (3) 48 (4) 49

Under which section of the MVAT Act, dealer can claim set - off for tax paid on purchases ?
(1) 42 (2) 44 (3) 48 (4) 49

---

80. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायद्याखालील कलम 42 च्या तरतुदी __________ शी संबंधित आहेत.
(1) कोणत्याही प्रदानाचे समायोजन करणे (2) सूट व परतावा
(3) कराचा आपसमेळ (4) भागीदारी संस्थांचे व भागीदारांचे दायित्व

Provisions under Section 42 of MVAT Act are related to __________.
(1) Adjustment of any payment (2) Exemption and refund
(3) Composition of tax (4) Liability of firms and partners

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

81. खालीलपैकी कोणती जोडी चूक आहे?

(1) वजावट अनुज्ञेय नसणे - नियम 54

(2) वजावट कमी करणे - नियम 53

(3) विशाल घटकांनी उत्पादित केलेल्या मालाची वजावट - नियम 55

(4) वजावटीची मागणी करणे व ती देणे - नियम 52

Which pair is incorrectly matched ?

(1) Non - admissibility of set - off - u/r 54

(2) Reduction in set - off - u/r 53

(3) Set - off in respect of goods manufactured by Mega units - u/r 55

(4) Claim and grant of set - off - u/r 52

---

82. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायद्याखालील कोणत्या तरतूदीनुसार देयकांच्या किंवा रोखीच्या ज्ञापनाच्या स्थळप्रती अथवा दुय्यम प्रती ठेवण्याच्या आणि देयका वर किंवा रोखीच्या ज्ञापनावर सही करण्याच्या बाबतीत-सूट मिळेल?

(1) कलम 86 (6) अन्वये (2) कलम 86 (4) अन्वये

(3) कलम 86 (5) अन्वये (4) कलम 86 (2) अन्वये

Under what provisions of MVAT Act the dealer shall be exempted from keeping counterfoils or duplicates of the bills or cash memos and from signing the bills or cash memos ?

(1) Under Section 86 (6) (2) Under Section 86 (4)

(3) Under Section 86 (5) (4) Under Section 86 (2)

---

83. खालीलपैकी कोणत्या अमूर्त मालावर, जर त्या मालाची फेरविक्री केली तरच वजावट मिळेल?

(1) स्वामीत्व हक्क (एकस्वाधिकार) (2) व्यापार चिन्ह

(3) सॉफ्टवेअर (4) ख्याती मूल्य

On which of the following intangible goods, set off is allowable only if they are resold ?

(1) patents (2) trade mark

(3) software (4) goodwill

---

84. म.मू. कर अधिनियम - 2002 अन्वये कुठल्या कलमातील तरतूद पुढील भाष्य करते. "मालाच्या कोणत्याही खरेदीवरील कर वजावटीची किंवा परताव्याची रक्कम ही, कोणत्याही बाबतीत, त्याच मालाच्या संबंधात, प्रत्यक्षात शासकीय कोषागारात भरलेल्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही".

(1) कलम 48 (1) (2) कलम 48 (5) (3) कलम 64 (3) (4) कलम 63

Which provision of MVAT Act 2002, states that, "In no case the amount of set off or refund on any purchase of goods shall exceed the amount of tax, in respect of the same goods, actually paid, into govt. treasury".

(1) Section 48 (1) (2) Section 48 (5) (3) Section 64 (3) (4) Section 63

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

85. खालील विधान पूर्ण करा.

"जर खरेदी केलेले वाहन इंधन/मोटार स्पिरीट, हे, स्वत:साठी/वैयक्तिक कारणासाठी वापरले असेल तर, असे इंधन ________".

(1) कर वजावटीचा दावा करण्यायोग्य असेल (2) कर वजावटीचा दावा करण्यायोग्य नसेल

(3) वरील पैकी दोन्ही (4) वरीलपैकी एकही नाही

Complete the following sentence "motor spirit purchased, if used for own/personal consumption, then it is ________".

(1) Entitled for set off (2) Not entitled for set off

(3) Both (1) and (2) (4) None of the above

---

86. खालीलपैकी कोणता व्यापारी म.मू. कर कायदा, 2002 च्या कलम 42 अन्वये आपसमेळ योजनेचा स्विकार करण्यास पात्र नाही ?

(1) बेकरी चालवणारा (2) खाद्यागृह चालवणारा

(3) उत्पादक (4) खाद्यपेय प्रबंधक (केटरर)

Which of the following dealers is not eligible to opt. for the composition scheme prescribed u/s 42 of MVAT Act, 2002 ?

(1) Baker (2) Eating house manager/keeper

(3) Manufacturer (4) Caterer

---

87. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायद्यांतर्गत चिंचेच्या बियांवर किती टक्के कर आहे ?

(1) 1% (2) कर मुक्त (3) 12.5% (4) 5%

What is the rate of tax an Tamarind seeds under the MVAT Act ?

(1) 1% (2) tax free (3) 12.5% (4) 5%

---

88. म.मू. कर अधिनियम 2002 च्या कलम 64 अन्वये लेखा पुस्तके प्रस्तुत करण्यासाठी खालीलपैकी कोणती नोटीस/सूचनापत्र काढण्यात येते ?

(1) नमूना 603 (2) नमूना 601 (3) नमूना 704 (4) वरील पैकी एकही नाही

Which of the following notices, is issued u/s 64 of MVAT Act 2002, for production of books of accounts ?

(1) Form 603 (2) Form 601 (3) Form 704 (4) None of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

89. आपसमेळ योजनेत भाग घेण्यासाठी हॉटेल व्यवसायिकाने कोणता फॉर्म भरला पाहिजे ?

(1) 3 (2) 1 (3) 4 (4) 5

Under composition scheme, in which form hotel dealer should apply for composition ?

(1) 3 (2) 1 (3) 4 (4) 5

---

90. जप्त केलेले जमाखर्च, रजिस्टर्स आणि कागदपत्रे कमीशनर किती दिवसांपेक्षा जास्त दिवस लेखी कारण दिल्याशिवाय स्वत:जवळ ठेवू शकत नाही ?

(1) 21 दिवस (2) 20 दिवस (3) 19 दिवस (4) 18 दिवस

For how many days Commissioner can retain seized books of accounts, registers or documents of any dealer without recording reasons therefor ?

(1) 21 days (2) 20 days (3) 19 days (4) 18 days

---

91. व्यवसाय कर कायदा 1975 मधील परिशिष्ट - 1 अन्वये जे व्यापारी महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा 2002 खाली नोंदणी झालेल्या आणि ज्यांची वार्षिक खरेदी किंवा विक्रीची उलाढाल. ₹ 25 लाखापेक्षा कमी आहे अशा व्यापाऱ्यांना सध्या वार्षिक व्यवसाय कर __________ इतका भरावा लागतो.

(1) ₹ 2000 (2) ₹ 2500 (3) ₹ 1500 (4) ₹ 1000

As per schedule 1 of the Profession Tax Act 1975 dealer Registered Under the MVAT Act 2002 and whose Annual Turnover of sale or purchase is less than ₹ 25 lakh at present, have to pay Profession Tax per annum at __________.

(1) ₹ 2000 (2) ₹ 2500 (3) ₹ 1500 (4) ₹ 1000

---

92. 'व्यवसाय कर कायदा 1975 ' मध्ये कलम 6 कशाशी संबंधित आहे ?

(1) व्याख्या (2) कर निर्धारणा (3) कराचा भरणा (4) विवरण पत्र

What does Section 6 of the Profession Tax 1975 deal with ?

(1) Definition (2) Assesment (3) Payment of tax (4) Returns

---

93. H - फॉर्मचा वापर खालीलपैकी केव्हा करतात ?

(1) डीम्ड एक्स्पोर्ट (2) आंतरराज्यीय विक्री

(3) डायरेक्ट एक्स्पोर्ट (4) डायरेक्ट इंपोर्ट

What does H - Form support ?

(1) Deemed Export (2) Interstate sale

(3) Direct Export (4) Direct Import

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

94. लक्झरी ॲक्ट प्रमाणे क्लबची व्याख्या खालीलपैकी कोणत्या कलमानुसार केली आहे ?

(1) कलम 2 (b - 1A)
(2) कलम 2 (b - 1)
(3) कलम 2 (d - 1)
(4) कलम 2 (d - 2 )

Which section of the Luxuries Act section defines "club" ?

(1) Section - 2 (b -1A)
(2) Section - 2 (b - 1)
(3) Section - 2(d - 1)
(4) Section - 2 (d - 2)

---

95. व्यवसाय कर भरण्यास उशीरा झाल्यास व्याजाचा दर __________ असेल.

(1) प्रत्येक महिन्यास 2%
(2) प्रत्येक महिन्यास 1.5%
(3) प्रत्येक महिन्यास 1.25%
(4) प्रत्येक महिन्यास 6%

What is the rate of interest for late payment of Profession Tax ?

(1) 2% p.m.
(2) 1.5% p.m.
(3) 1.25% p.m.
(4) 6% p.m.

---

96. व्यापाऱ्याने के.वि.का. खाली नोंदित होण्यासाठी अर्जावर रु. __________ इतकी 'कोर्ट फी' स्टॅम्पच्या स्वरुपात द्यावी लागते.

(1) रु. 20 (2) रु. 21 (3) रु. 25 (4) रु. 26

A fee of __________ by way of stamps shall be payable in respect of entry application for registration under Central Sales Tax Act.

(1) Rs. 20 (2) Rs. 21 (3) Rs. 25 (4) Rs. 26

---

97. केंद्रीय विक्रीकर कायदा 1956 नुसार, ज्या राज्यात मालाची वाहतुक __________ ते राज्य केंद्रीय विक्रीकर वसूल करु शकते.

(1) संपते
(2) मधून जाते
(3) सुरु होते
(4) वरील पैकी कोणतेही नाही

State in which movement of goods __________ is entitled to collect central sales tax as per the Central Sales Tax Act 1956.

(1) terminates
(2) passes through
(3) commences
(4) None of the above

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**98.** महाराष्ट्र लक्झरी टॅक्स ॲक्ट 1987 मधील कलम - 3 कशा विषयी आहे ?

(1) कर लावणे (2) नोंदणी (3) व्याख्या (4) दंड

What is the Section - 3 of the Maharashtra Tax on Luxuries Act 1987 about ?

(1) Levy of Tax (2) Registration (3) Definitions (4) Penalty

---

**99.** व्यवसाय कर कायदा 1975 च्या कोणत्या कलमानुसार कर्मचाऱ्यांच्या वतीने कर वजा करण्याची व तो भरण्याची मालकाची जबाबदारी आहे ?

(1) कलम - 2 (2) कलम - 4 (3) कलम - 6 (4) कलम - 7

What section of the Profession Tax Act 1975 makes Employer liable to deduct and pay tax on behalf of employees ?

(1) Section - 2 (2) Section - 4 (3) Section - 6 (4) Section - 7

---

